# जन संपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

## P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY

Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalwa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819208279


**प्रेस नोट -** **दि.०५/०८/२०२६**

## '' ०८ कोटी रुपयाची खंडणीची मागणी करुन त्यापैकी १० लाख रुपयांचा पहिला हप्ता स्विकारणा-या ०३ आरोपींना अटक ''

## गुन्हे शाखा, घटक-१, ठाणेची कामगिरी.

कळवा ठाणे येथे राहणारे प्रसिध्द् बांधकाम व्यवसाईक श्री. सौरभ नंदकुमार साळवी, यांना केशव हाईट्स या इमारतीचे मुळ मालक मयत झाल्यानंतर केलेल्या नोटरीच्या आधारे ई.डी., सीबीआय, ई ओ डब्लु, व मा. न्यायालयात तक्रार करुन अडचणीत आणून त्रास देवू अशी धमकी देवून संतोष बावडेकर याने त्या सदंर्भात ई.ओ. डब्लू ठाणे यांच्याकडे तक्रार करुन ती तक्रार मागे घेण्यासाठी व इतर विभागात तक्रार न करण्यासाठी विविध खात्यांना व विभागांना सुमारे साडेचार कोटी रुपये व संपुर्ण प्रकरण लिगल करण्यासाठी संतोष बावडेकर व सिध्देश बेंडकोळी व इम्तीयाज मोमीन यांच्यासाठी चार कोटी रुपयांची खंडणीची मागणी करीत असल्याची तक्रार मा. वरिष्ठांना प्राप्त झाली होती. मा. वरिष्ठांनी त्यावर कारवाई करण्याबाबत गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे यांना सुचना दिलेल्या होत्या.

गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल वालझाडे व त्यांचे पथकाने सापळा पथक तयार करुन तक्रारदार यांना आरोपीत यांचेशी होणारे खंडणीच्या मागणी संदर्भातील संभाषण रेकॉर्ड होण्यासाठी त्यांना व्हाईस रेकॉर्डर डिव्हाईस देण्यात आला. त्यामध्ये आरोपीत हे तक्रारदार यांचेकडे खंडणीची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाले.

दिनांक ३०/०७/२०२६ रोजी तक्रारदार यांचे केशव हाईटस्, बी बिल्डींग, ९० फुट रोड, पारसिकनगर, कळवा, ठाणे येथील कार्यालयात आरोपी हे खंडणीचा १० लाख रुपयाचा पहिला हप्ता स्विकारण्यासाठी आले त्यांनी रोख रक्कम स्विकारल्यानंतर गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे च्या पथकाने त्यांना शिताफिने ताब्यात घेवून १० लाख रुपयाची रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. ताब्यात घेतलेल्या आरोपींची नांवे खालील प्रमाणे.

१) संतोष मनोहर बावडेकर, वय- ४७ वर्षे, रा. साई भुषण अपार्टमेंट रुम नं २०३, खारीगांव, कळवा, जि. ठाणे, मुळगांव मु.पो.९२/३, ओंकारनगर, बेळगांव, कनार्टक,

२) सिध्देश हरीश्चंद बेंडकोळी, वय- ३५ वर्षे, रा. केशव हाईट्स, रुम नं ५०५, ५ वा मजला, खारीगांव, कळवा जि. ठाणे.

३) इम्तीयाज इलियास मोमीन, वय- ३१ वर्षे, रा. एस-५, विजयनगर कोर्टच्या पाठीमागे, विजयनगर, सांगली, जिल्हा- सांगली.

सदर आरोपी विरुध्द् तक्रारदार श्री. सौरभ नंदकुमार साळवी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन कळवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. ४५३/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०८(२), ३०८(३), ३०८(६), ३(५) प्रमाणे दिनांक -०३/०८/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मा. न्यायालयाने त्यांची दि. ०७/०८/२०२६ रोजी पावेतो तपासकामी पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक, श्री. अमोल वालझाडे हे करीत आहेत.

नमुद कारवाई श्री. आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे, श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, पोलीस सह आयुक्त, ठाणे, डॉ. श्री. पंजाबराव उगले, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, ठाणे, श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे, श्री. शेखर बागडे, सपोआ, शोध-१, गुन्हे शाखा, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक-१, ठाणेचे वपोनि/अनिल शिंदे, पोलीस निरीक्षक अमोल वालझाडे, सपोनि प्रविण फडतरे, चित्रा चौधरी, पोउपनिरी/प्रकाश शिरसाठ, श्रेपोउपनिरी/दिपक जाधव, रविंद्र पाटील, सहा.पोउपनिरी/सुनिल माने, दयानंद नाईक, पोहवा अविनाश पाटील, नागराज सोनकडे, प्रशांत निकुंभ, व्यंकट धायगोडे, शब्बीर फरास, नंदकुमार पाटील, दिपक जाधव, मुकुंद आव्हाड, संदीप महाडीक, धनंजय आहेर, पोशि/सागर सुरळकर, मयुर लोखंडे, अमोल ढावरे, प्रशांत लवटे व मपोहवा/ दिपाली जाधव, मलिका बहिरम व चापोहवा/शशीकांत सावंत यांनी केली आहे.